**MHBI100016312025**

**<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक २९१/२०२५ मधील</u>**

**<u>निशाणी क्र.३७ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२,८ व ९ यांनी त्यांच्याविरुध्द जबाब दावा दाखल करण्यास झालेला ४१ दिवसांचा विलंब माफ करुन त्यांचा जबाब दावा अभिलेखावर घेण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. २,८ व ९ यांचे असे कथन आहे की, दि. ०३.१०.२०२५ रोजी त्यांना समन्स तामील झाले. परंतु, समन्स सोबत दाव्याची प्रत वादीने दिली नव्हती तसेच न्यायालयातील फाईल मध्ये प्रतिवादी करिता दाव्यात दाव्याची प्रत दिली नव्हती. प्रतिवादी हजर झाल्यानंतर प्रतिवादी तर्फे दिलेल्या अर्जात नमूद केले होते. त्यानंतर वादीने दि. २३.१२.२०२५ रोजी दाव्याची प्रत प्रतिवादीस दिली त्यांची नोंद निशाणी १ वर आहे. म्हणुन वादीस जवाब दाखल करण्यास ४१ दिवसांचा विलंब झाला आहे. सदर प्रकरण जमीन जायदादचे असल्यामुळे योग्य न्यायदान होण्याकरिता जवाबदावा दाखल करण्यास झालेला ४१ दिवसांचा विलंब माफ करण्याची विनंती केली आहे.

३. वादीच्या विद्वान विधीज्ञांनी अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करत असे कथन केले की, सदर प्रकरणातील वादीस लवकर न्याय मिळु नये या दुष्ट हेतुने प्रतिवादीने जाणीवपुर्वक विलंबाने जबाब दावा दिलेला आहे. करिता अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वाटणी करून वेगळा ताबा मिळणे बाबत दाखल केलेला आहे. समन्सची बजावणी झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत प्रतिवादीने कैफियत दाखल करणे अपेक्षित होते. प्रतिवादी क्रं २,८ व ९ यांना नि.क्रं २७ वरील दि. ०६.१०.२०२५ रोजीच्या बेलिफ अहवालाप्रमाणे दि. ०३.१०.२०२५ रोजी समन्स बजावणी झालेली असुन प्रतिवादी क्रं २ हे दि. ०५.११.२०२५ व प्रतिवादी क्रं

८ व ९ हे दि. १३.०२.२०२६ रोजी वकिलपत्र दाखल करून हजर झालेले आहेत. प्रतिवादी याने समन्स बजावणी झाल्यापासुन ९० दिवसांच्या आत म्हणजेच दि. ०१.०१.२०२६ रोजी पर्यंत कैफियत दाखल करणे अपेक्षित होते. परंतु प्रतिवादीने सदरचा अर्ज दि. १३.०२.२०२६ रोजी दाखल केला असल्यामुळे प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यासाठी जवळ जवळ ४४ दिवसांचा उशीर झालेला आहे. परंतु सदरचा विलंब हा अवाजवी नाही. दाव्याचा योग्य न्यायनिवाडा होण्याकरीता प्रतिवादी क्र. २,८ व ९ चा लेखी जबाब दावा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांना लेखी जबाब दावा दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे गरजेचे वाटते. कारण असे झाल्यास त्यांचा लेखी जबाब दावा त्यांना दाखल करता येईल व तो दावा गुणदोषावर निकाली काढण्याकरीता गरजेचे आहे. यात काही एक शंका नाही की, प्रतिवादी क्र. २,८ व ९ यांना जबाब दावा सादर करण्यास उशीर झालेला आहे. मात्र आज रोजी पावेतो प्रस्तुतच्या दाव्याची सुनावणी सुरु झालेली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. २,८ व ९ यांना जबाबदावा दाखल करण्यास झालेला विलंब त्यांच्यावर योग्य तो खर्च लादुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. एकुणच वरील कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रुपये २००/- च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. २,८ व ९ यांना लेखी जबाब दावा दाखल करण्यास झालेला विलंब रद्द करण्यात येत असुन खर्चाची पुर्तता केल्यानंतर त्यांचा लेखी जबाब दावा अभिलेखावर घेण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र. २,८ व ९ यांनी पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये २००/- वादीस देण्यात यावी.

POURNIMA VIJAY CHAVAN
Digitally signed by POURNIMA VIJAY CHAVAN
Date: 2026.08.12 15:25:07 +0530

(पी.व्ही.चव्हाण)

दिनांक:- १२.०८.२०२६. २ रे सह दि.न्या.क. स्तर, केज.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Dictated on | : 12.08.2026 |
| Transcribed on | : --------------- |
| Checked & signed on | : 12.08.2026 |

Sd/-
( P. G. Deshpande)
Stenographer Grade-3,
Ct. of 2nd Jt. CJJD and JMFC, Kaij.